सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या अधिनस्त सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांचे कार्यालय व अधिनस्त कार्यालयांकरीता लॅपटॉप खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

सहकार विभाग

शासन निर्णय क्रमांकः PIC-२०२६/प्र.क्र.१६/नोंदणी शाखा

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
दिनांक: १६ जुलै, २०२६.

वाचा :-

(१) शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, क्रमांक भाखंस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४, दि.०१ डिसेंबर, २०१६.
(२) शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, क्रमांक संकीर्ण-२०१६/प्र.क्र.२१५/उद्योग ४, दि.२४ ऑगस्ट, २०१७.
(३) शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, क्रमांक भाखंस-२०१७/प्र.क्र.२०४/ उद्योग-४, दि.०८ डिसेंबर, २०१७.
(४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. मातंस २०११/प्र.क्र.१२५/३९, दि.२३ सप्टेंबर, २०११.
(५) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या दि.१५.०७.२०२६ रोजीच्या बैठकीचे कार्यवृत्त.

प्रस्तावना :-

सहकार विभागाच्या अंत्यत महत्तवाच्या सेवा जसे, सहकारी संस्था नोंदणी, सावकारी परवाना देणे व त्याचे नूतनीकरण या सेवा आपले सरकार पोर्टलवर पूर्णपणे ऑनलाईन करण्यात आलेल्या आहेत. क्षेत्रीय स्तरावरील कामकाजाची गती व ऑनलाईन संनियत्रण करण्यासाठी अधिकाऱ्यांना लॅपटॉप उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या अधिनस्त सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था पुणे व त्यांचे अधिनस्त क्षेत्रीय कार्यालयांकरीता २५० लॅपटॉप खरेदी करण्याची मागणी सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून विभागास प्राप्त झाली आहे.

त्यानुसार सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या अधिनस्त सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे व त्यांचे अधिनस्त क्षेत्रीय कार्यालयांकरीता २५० लॅपटॉप खरेदी खरेदी करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या अधिनस्त सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे व त्यांचे अधिनस्त क्षेत्रीय कार्यालयांकरीता २५० लॅपटॉप खरेदी करण्यास मा. प्रधान सचिव (सहकार व पणन) यांच्या अध्यक्षतेखाली विभागाच्य प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या दि.१५.०७.२०२६ रोजीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे.

२. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या संदर्भाधीन क्र.१ शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आलेल्या शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या नियमपुस्तिकेतील कार्यपद्धतीचा अवलंब करून गव्हर्नमेंट ई- मार्केटप्लेस (GeM) पोर्टलवर ऑनलाईन BID प्रक्रियेद्वारे सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या अधिनस्त सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे व त्यांचे अधिनस्त क्षेत्रीय कार्यालयांकरीता २५० लॅपटॉप खरेदी करण्यास व त्याकरीता येणाऱ्या अंदाजित ₹४.०० ते ₹४.५० कोटी इतक्या रकमेच्या अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

३. गव्हर्नमेंट ई- मार्केटप्लेस (GeM) पोर्टलवरून खरेदी करावयाच्या धोरणानुसार सदर खरेदीची रक्कम रुपये दहा लाखापेक्षा अधिक असल्याने निविदा (Online Bidding) पद्धतीने न्यूनतम पुरवठादार अंतिम केल्यानंतर संबंधितास खरेदीबाबतचे कार्यादेश (Work Order) देण्यात येतील.

४. प्रस्तुत संगणक सामुग्रीचे विर्निदेश (Specification) माहिती तंत्रज्ञान विभागाकडून प्रमाणित करून घेण्यात आले आहेत.

५. उपरोक्त खर्च "मागणी क्र. व्ही-२, ३४५१ सचिवालयीन आर्थिक सेवा, (०२) राज्य नियोजन यंत्रणेत वाढ करणे, (०२)(०३) ई-गव्हर्नन्स कार्यक्रम (सहकार) (कार्यक्रम) (३४५१२७५५) १७-संगणक खर्च" या लेखाशिर्षातर्गत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

६. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दि.१७ एप्रिल, २०१५ अन्वये वित्तीय अधिकार नियमपुस्तिका-१९७८ मधील भाग पहिला, उपविभाग-२ मधील अनुक्रमांक २७अ नियम ७६ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारान्वये व दि.१५.०७.२०२६ रोजी झालेल्या विभागाच्या प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या घेण्यात आलेल्या निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७१६१६४५५३९२४७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

NITIN VASANTRAO GAIKWAD

Digitally signed by NITIN VASANTRAO GAIKWAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CMTD, 2.5.4.20=5892C3FD8686C1921E784A3FAA9888D155B03F5591CE11B21A1B5006247F6972, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2276AC762AF372D872C2F01D5BB5086166F4A6E20A1BDF9762D556A93F5D118E, cn=NITIN VASANTRAO GAIKWAD
Date: 2026.07.16 16:46:48 +05'30'

(नितीन गायकवाड)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. मा. राज्यमंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. महालेखापाल, महाराष्ट्र १ (लेखा परीक्षा/लेखा अनुज्ञेयता), मुंबई
४. महालेखापाल, महाराष्ट्र २ (लेखा परीक्षा/लेखा अनुज्ञेयता), नागपूर
५. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. प्रधान सचिव (सहकार व पणन), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. सचिव (माहिती तंत्रज्ञान), सामान्य प्रशासन (मा व तं) विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१०. निवासी लेखा अधिकारी, मुंबई.
११. अवर सचिव (अर्थसंकल्प), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.